परराष्ट्र सचिवांची यूएई ला औपचारिक भेट

परराष्ट्र सचिव श्री. विक्रम मिस्री हे 1 - 2 नोव्हेंबर 2026 दरम्यान संयुक्त अरब अमिरातीच्या औपचारिक भेटीवर होते. भारत-यूएई संबंधांची वैशिष्ट्ये असलेल्या नियमित, उच्च-स्तरीय सहभागाच्या संदर्भात ही भेट झाली आणि भारत-यूएई सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीच्या प्रगतीचा आढावा घेण्याची संधी मिळाली.

2. अबू धाबी मध्ये, परराष्ट्र सचिवांनी यूएईच्या आंतरराष्ट्रीय सहकार्य राज्यमंत्री आणि भारतासाठीचे विशेष दूत, महामहिम रीम अल हाशिमी यांच्याशी चर्चा केली. उभय बाजूंनी विविध क्षेत्रांमध्ये धोरणात्मक द्विपक्षीय भागीदारीचा आढावा घेतला आणि सहकार्याच्या नवीन मार्गांचा शोध घेतला. त्यांनी प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही विचारांचे आदान-प्रदान केले.

3. परराष्ट्र सचिवांनी अबू धाबीच्या सांस्कृतिक आणि पर्यटन विभागाचे अध्यक्ष महामहिम मोहम्मद खलिफा अल मुबारक यांचीही भेट घेतली. या बैठकीत भारतीय गृह, तसेच पर्यटन यासह सांस्कृतिक आणि सृजनशील देवाणघेवाणीमध्ये सहकार्यासाठी जवळचे संस्थात्मक संबंध आणि नवीन मार्ग शोधण्याची संधी मिळाली, ज्यामुळे दोन्ही देशांतील लोक एकमेकांच्या अधिक जवळ येत आहेत.

4. परराष्ट्र सचिवांनी अबु धाबी वित्त विभागाचे अध्यक्ष आणि एल'आयएमएडी होल्डिंग कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व समूह मुख्य कार्यकारी अधिकारी, महामहिम जासेम मोहम्मद बु अताबा अल जाबी यांच्याशीही संवाद साधला. ही चर्चा आर्थिक सहभाग विस्तारण्याच्या शक्यतांवर केंद्रित होती, ज्याचा उद्देश गुंतवणुकीचा ओघ वाढवणे आणि दोन्ही अर्थव्यवस्थांना लाभ होईल अशा दीर्घकालीन व्यावसायिक भागीदारी निर्माण करणे हा होता.

5. या भेटीने भारत-यूएई संबंधांमधील परस्पर विश्वास आणि धोरणात्मक समान उद्दिष्टे अधोरेखित केली, तसेच आगामी काळात या भागीदारीला अधिक गती देण्याचा उभय बाजूंचा सामायिक निश्चय दिसून आला.

अबू धाबी

02 नोव्हेंबर 2026